# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,औरंगाबाद

**दिनांक १०/१/२००३ रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या औरंगाबाद मंडळाच्या १२४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.**

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १.मा.आमदार श्री. कुंडलीकराव नागरे | सभापती,औरंगाबाद मंडळ |
| २. मा. श्री. के.वी.गवळी. | उपसभापती तथा मुख्य अधिकारी,औरंगाबाद मंडळ |
| ३. मा. श्री. मकरंद सावे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ४ मा. श्री. बवनराव देशमुख. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ५.. मा. श्री. अॅड जे.पी. पाटील. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ६. मा. श्री. साहेबराव खरात. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ७. मा. श्री. संजय वाघचौरे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ८.मा. श्री. वामनराव राऊत. | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ९. मा. श्री. राजेश्वर चव्हाण. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| १०.मा. श्री. विश्वासराव उपासे. | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ११. मा. श्री. मिटकरी,नगररचनाकार उपसंचालक नगररचना यांचे प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी. |
| १२. मा. श्री. सिकंदर अली, कार्यकारी अभियंता मा. आयुक्त, महानगर पालिका औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. | सदस्य प्रतिनिधी., |

........

मंडळाच्या १२४ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांचे प्रथम मुख्य अधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी स्वागत केले व मंडळाचे सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात झाली.

**विषय क्रमांक १:- औरंगाबाद मंडळाच्या दिनांक २३/१२/२००२ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायमकरणे.**

मंडळाच्या १२३ व्या बैठकीतील भोकरदन येथील अल्प उत्पन्न गटातील १४९ गाळयांसाठीच्या निविदेबाबत व अत्यल्प उत्पन्न गटातील १२० गाळयांच्या निविदेबाबत पारीत केलेला मंडळाचा ठराव क्रमांक ७३९ कायम करतांना मंडळाचे मा. सदस्य श्री. सावे व श्री. जे.पी पाटील यांनी प्रतिपादन केले की, जर फेर निविदा मागविण्यात आल्या तर सदरील काम कार्यान्वीत करण्यासाठी बराच विलंब होईल. वास्तविक अगोदरच या योजनेचे काम सुरु करण्यास या ना त्या कारणास्तव बराच विलंब झालेला आहे आणि फेरनिविदा मागविल्यास त्यामध्ये आणखी भर पडणार आहे. ज्या लाभधारकांनी या योजनेमध्ये पैसे भरले आहेत.त्यांचेकडुन काम सुरु करण्याचा सतत तागदा होत आहे. त्यामुळे मागील बैठकीमध्ये संबंधीत निम्नतम निविदाधारक यांनी वाटाघाटीमध्ये ज्या दरामध्ये काम करण्यास

तयारी दर्शविली आहे. त्या दरामध्ये दोन्ही कामांच्या बाबतीत पुन्हा प्रत्येकी एक टक्का दर कमी करण्यास संबंधीत निविदाधारक तयार असल्यास त्याबाबतीत मुख्य अधिकारी यांनी त्यांचेकडुन तसे लेखी संम्मती घेऊन सदरील वाटाघाटीचे सुधारीत दर मंजूर करण्याबाबत प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावा. सदरील प्रस्तावास सर्व सदस्यांनी एकमुखी मान्यता दिली.

यावेळी मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी याप्रमाणे वाटाघाटीचे दर मान्य केल्यास गाळयांचे मुळ किंमतीमध्ये वाढ होईल व त्यामुळे संबंधीत लाभधारक गाळयांची वाढीव किंमत भरण्यासाठी विरोध करण्याची शक्यता असल्याचे नमुद केले. त्यामुळे वाढीव किंमत भरण्यास (त्यांची) तयारी असल्याबद्यल संम्मती घ्यावी लागेल त्यासाठी सध्याचा निविदा स्विकृतीच्या दराचा कल विचरात घेता मागील बैठकीत प्रस्तावीत केल्याप्रमाणे १५ टक्के कमी दराने वाटाघाटीचे दर कायम करणे योग्य होईल असे मत व्यक्त केले. तथापी मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. सावे यांनी असे नमुद केले की, एकाच वेळी चालु असलेल्या कामाच्या बाबतीत निविदा स्विकृतीचे दर हे कमी/अधिक असु शकतात. सदरील दर हे कामाचे ठिकाण, त्या ठिकाणी लागणाऱ्या कामाच्या साहित्याची उपलब्धता इत्यादींवर अवलंबुन असतात. त्यामुळे निविदा स्वकृतींचा जो कल आहे त्याप्रमाणे दर येतीलच असे म्हणता येत नाही. त्यामुळे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सदरील योजनेच्या अंमलबाजवणीसाठी पुढील विलंब टाळण्याच्या दृष्टीने, संबंधीत निम्नतम निविदाधारक यांनी दिनांक २३/१२/२००२च्या बैठकीमध्ये सादर केलेल्या वाटाघाटीच्या दरामध्ये पुन्हा प्रत्येकी १ टक्का दर कमी करण्यास तयार असल्याबाबत त्यांना विचारणा करावी व ते कमी करण्यास तयार असल्यास त्याप्रमाणे सदर वाटाघाटीचे दर मंजूरीच्या निर्णयास्तव प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठवावा. त्यास मंडळातील इतर उपस्थित सदस्यांनी मान्यता दिली व खालील प्रमाणे ठराव कायम करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

**ठराव क्रमांक ७४२:-**

अ. भोकरदन जिल्हा जालना येथील सर्व्हे क्रमांक ५४( भाग) या जमिनीवरील अल्प उत्पन्न गटातील १४९ गाळयासाठी मे. तान्या कन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे १६.७८७ टक्के जास्तीच्या दरामध्ये दिनांक २३/१२/२००२ च्या बैठकीत वाटाघाटीद्वारे कमी करुन दिलेल्या १४.४० टक्के जास्तीच्या दरामध्ये आणखी एक टक्का कमी करण्यासाठी म्हणजे १३.४० टक्के जास्तीच्या दराने तसेच अत्यल्प उत्पन्न गटातील १२० गाळयांसाठी श्री. वी.एम. दानवे पाटील यांची २० टक्के जास्तीच्या दराच्या निविदेमध्ये त्यांनी दिनांक २३/१२/२००२ रोजीच्या बैठकी मध्ये वाटाघाटीद्वारे कमी करुन दिलेल्या १५ टक्के जास्तीच्या दरा मध्ये आणखी १ टक्का दर कमी करण्यास म्हणजे १४.०० टक्के जास्तीच्या दराने काम करण्यास तयार असल्यास दोन्ही निविदाधारकांकडुन मुख्य अधिकारी यांनी लेखी सम्मती घेऊन, त्यासह सुधारीत वाटाघाटीच्या दरास मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणास मंजूरीच्या निर्णयास्तव सादर करावा.

ब. दिनांक २३/१२/२००२ रोजी झालेल्या १२३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वरील बदलासह सर्वानुमते कायम करण्यांत आला.

विषय क्रमांक २:- सन २००२-२००३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक .

सदर विषयीच्या बाब टिप्पणीबाबत मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली. मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पानुसार योजनेची कामे काळजीपूर्वक राबविली जातील व उद्दिष्टे पुर्ण करण्याची काळजी घेतली जाईल. सन २००२-२००३ मध्ये काही योजना घेण्याचे प्रस्तावीत होते. परंतु वेळेवर जमिनी ताब्यात न मिळाल्यामुळे व प्रस्तावीत योजनेतील गाळयांना ठोसमागणी/ प्रतिसाद न मिळाल्यामुळे योजना सुरु होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे २००३-२००४ च्या अर्थसंकल्पात जमिनी ताब्यात येतील असे गृहीत धरुन व योजनेतील गाळयांना/भूखंडाना ठोस मागणी /प्रतिसाद मिळेल असे गृहीत धरुन योजनांवर तरतुद प्रस्तावीत केलेली आहे.मंडळाचे सदर २००२-२००३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मान्यता घेऊन प्राधिकरणाला पाठवावयाची आहेत. याबाबत मा. सभापती व मडळाचे सर्व मा. सदस्य यानी सांगितले की, अंदाजपत्रकात ज्या जिल्हानिहाय योजनेवर या चालु वर्षी व सन २००३-२००४ मध्ये खर्च केल्या जातील याची काळजी मंडळाचे अधिकाऱ्यांनी घ्यावी. जेणे करुन जास्तीत जास्त योजना राबविल्या जातील. मा. सदस्य श्री. सावे व मा. सदस्य श्री. पाटील यांनी सांगितले की,२००३-२००४ च्या अर्थसंकल्पामध्ये नमुद केलेल्या योजनां व्यतिरिक्त आणखी कांही नव्या योजना घेण्याचे प्रस्तावीत झाल्यास त्या समाविष्ट करता येऊ शकतील काय ? याबाबत मंडळाचे मुख्य लेखा अधिकारी यांनी स्पष्टीकरण दिले की, जर २००३-२००४ मध्ये आणखी नविन योजना घेण्याचे ठरल्यास त्यानुसार प्राधिकरणाला विशेष प्रस्ताव पाठवुन त्यास मंजूरी घेता येते व त्यानंतर अशा योजना सुधारीत अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याची तरतुद आहे.

वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७४३:-**

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सन २००२-२००३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००३-२००४ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे व मंडळाच्या मंजूरीसह सदर अंदाजपत्रके प्राधिकरणास पाठविण्यात यावीत. सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करण्यांत यावी.

**विषय क्रमांक ३:-औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाच्या अखत्यारीतील विशिष्ट कारणासाठी आरक्षित अनिवासी भूखंडाचे विल्हेवाटीबाबत.**

या विषयीच्या बाबटिप्पणी विषयीची माहिती मा. मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली. मा. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, एकनाथनगर औरंगाबाद येथे मंडळाच्या वसाहतीत पोस्ट ऑफिससाठी राखीव १ सुविधा भूखंड व बँकेसाठी राखीव १ सुविधा भूखंड असे दोन भूखंड आहेत. तसेच तिसगांव येथे पोस्ट आफीससाठी १ सुविधा भूखंड आहे. एकनाथनगर येथील बँकेसाठीच्या सुविधा भूखंडासाठी जाहिरात दिली होती परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. तसेच एकनाथनगर मधील पोस्ट ऑफीससाठीचा १ सुविधा भूखंड व तिसंगाव येथील सुविधा भूखंड असे दोन भूखंड पोस्ट ऑफीसने घ्यावे म्हणून पोस्ट खात्यास विनंती केली होती परंतु पोस्ट खात्याने प्रतिसाद दिला नाही. परिणामी उपरोक्त ३ सुविधा भूखंड अद्याप रिक्त आहेत. म्हणून सदर भूखंडाचे आरक्षण बदलुन त्या ठिकाणी व्यापारी /सुविधा भूखंड असे आरक्षण प्रस्तावित करुन अशा सुधारीत आराखडयास स्थानिक प्राधिकरणाची मंजूरी घेऊन जाहिरात देऊन निविदाद्वारे उपरोक्त तिन्ही भूखंड वितरण करण्यासाठीच्या प्रस्तावास मंडळाची मंजूरी घेण्यासाठी प्रस्ताव मंडळा समोर ठेवण्यांत आला आहे . यावर मंडळाचे सदस्य मा. श्री. सावे व मा. श्री. वाघचौरे यांनी सांगितले की, एकनाथनगर येथील मंडळाच्या वसाहतीमधील आरक्षीत दोन्ही भूखंड ( पोष्ट ऑफिस भूखंड व बँकेंचा भूखंड) एकमेकांस लागुन असल्यामुळे त्याचे एकत्रीत करुन एक मोठा भूखंड प्रस्तावित करावा व अशा मोठया भूखंडाच्या प्रस्तावित आराखडयास स्थानिक प्राधिकरणाची मंजूरी घेऊन सदर भूखंड राष्ट्रीयकृत बँकेस/नागरी सहकारी बँकेला निविदेद्वारे विकण्यासाठी व त्यासाठी मागणी अजमाविण्यासाठी परत जाहिरात देण्याची कारवाई करावी. तसेच तिसगांव येथील मंडळाच्या वसाहतीमधील पोस्ट ऑफिससाठी आरक्षीत असलेला भूखंड हा पोस्ट ऑफीस घेण्यास तयार नसल्यामुळे सदर भूखंडाचे आरक्षण बदलुन हा भूखंड सुविधा भूखंडामध्ये रुपांतरीत करुन त्याप्रमाणे सुविधा भूखंड म्हणून जाहिरात देऊन निविदेद्वारे विकण्याची कारवाई करावी,असे मा. सदस्य श्री. वाघचौरे व मा. श्री. सावे यांनी बैठकीत प्रतिपादन केले. मा. सभापती यांनी सूचना केली की,एकनाथनगर मधील दोन्ही भूखंड एकत्रित करुन ते जाहिरात देऊन निविदेद्वारे बँकेला विकण्यासाठी व तिसगांव येथील पोस्ट ऑफीससाठीच्या राखीव भूखंडाचे आरक्षण बदलुन सदर भूखंड सुविधा भूखंड म्हणून तो जहिरात देऊन निविदेद्वारे वाटपाची कारवाई करावी.

उपरोक्त प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मंडळाने खालील प्रमाणे एकमताने निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ७४४:-** एकनाथनगर येथील मंडळाच्या वसातीमधील बँकेसाठीचा एक राखीव भूखंड व पोस्ट ऑफिससाठीचा एक राखीव भूखंड अशा दोन भूखंडांचे एकत्रिकरण करावे व असा एक मोठा भूखंड जाहिरात देऊन निविदेद्वारे राष्ट्रीयकृत बँकेला/नागरी बँकेला विकण्याची रितसर कारवाई करण्यांत यावी. तसेच तिसगांव येथील म्हाडाच्या वसाहती मधील पोस्ट ऑफीसासाठी आरक्षीत असलेल्या एका भूखंडाचे आरक्षण बदलुन त्याभूखंडाची सुविधा भूखंड म्हणून जाहिरात देऊन निविदेद्वारे तो विक्री करण्यात यावा,असा मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला.

मा.सभापती,औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने आयत्या वेळचा विषय:-

विषय क्रमांक ४:- आर-२८ सिडको,नविन औरंगाबाद येथील रहिवाशी सोसायटी भूखंडाच्या निविदाबाबत.

सदर विषयाच्या बाब टिप्पणी बाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंडळाच्या दिनांक २३/१२/२००२ रोजीच्या बैठकीत मा. डॉ.शिंदे सदस्य यांनी आयत्या वेळेच्या विषयामध्ये आर-२८,सिडको नविन औरंगाबाद येथील रहिवाशी सोसायटी भूखंडाबात मुद्दा उपस्थित करुन प्रस्ताव मांडला होता की, सदर भूखंडासाठी एकच निविदा प्राप्त झाली असल्यामुळे सदर निविदा अद्याप उघडण्यात आलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मिळणार नसल्यामुळे सदरची एकमेव प्राप्त झालेली निविदा रद्द करुन उपरोक्त भूखंडासाठी फेरनिविदा बोलविण्यांत याव्यात या प्रस्तावास मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी अनुमोदन दिले व मंडळाने उक्त भूखंडाच्या विक्रीसाठी प्राप्त झालेली एक निविदा रद्द करावीव फेरनिविदा काढाव्यात असा निणर्य घेतला होता,अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळास दिली.मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की,सदरचा निर्णय झाल्याबाबत दिनाक २३/१२/२००२ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांमध्ये सदर बाब समाविष्ट करण्याचे अनावधानाने राहुन गेले त्यामुळे आता सदर निर्णय दिनांक २३/१२/२००२ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतामध्ये समाविष्ट करणे व घेतलेल्या निर्णयाच्या स्थायी करणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.याबाबत मंडळाचे सर्व मा. सदस्यांनी सांगितले की, उपरोक्त भूखंडाची एकमेव प्राप्त झालेली निविदा रद्द करुन फेरनिवदा मार्गावण्यांत याव्यात व त्याप्रमाणे सदर निर्णय दिनांक २३/१२/२००२ रोजीच्या कार्यवृत्तांतात समाविष्ट करण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे व सदर निर्णय स्थायी केल्याबाबत मंडळाने सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक ७४५:-

आर-२८, सिडको, नविन औरंगाबाद येथील रहिवाशी सोसायटी भूखंडसाठी एकमेव प्राप्त झालेली निविदा रद्द करण्यात यावी व या भूखंडासाठी फेरनिविदा काढण्यात याव्यात व तसेच सदर निर्णय दिनांक २३/१२ /२००२ रोजीच्या कार्यवृत्तांतात समाविष्ट करण्यात यावा व सदर निर्णय स्थायी करण्यांत येत आहे, असा मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला.

वरीलप्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मा. सभापती व मा. सदस्यांनी खालील प्रमाणे बैठकीत मुद्दे उपस्थित केले व त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

१. मा. सदस्य श्री. उपासे व श्री. सावे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, उस्मनाबाद जिल्हयात राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत व मंडळाच्या नियमित गृहनिर्माण योजनां अंतर्गत कोणतेही काम प्रस्तावीत नाही किंवा केलेले नाही. उस्मानाबादचे उपअभियंता/जिल्हा गृहनिर्माण अधिकारी किंवा कनिष्ठ अभियता कधीच सदस्यांना भेटुन मंडळाचे केलेल्या कामाबाबत माहिती देत नाहीत. उस्मानाबादचे मंडळाचे उपअभियंता / जिल्हा गृहनिर्माण अधिकारी /कनिष्ठ अभियंता यांनी जमिन संपादनाची कामे व झोपडपटटी सुधार याजनेची कामे मंडळाचे सदस्य यांचे संपर्कात राहुन उस्मानाबाद येथे सुरु होण्याच्या दृष्टीने पाठपुरावा व प्रयत्न करावा असे मंडळाचे सर्व मा. सदस्य यांनी सांगितले.तसेंच कामांची गती वाढविण्यासाठी उस्मानाबादचे उपअभियंता/जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना सूचना द्याव्यात असे बैठकीत ठरले. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, वरीलप्रमाणे उपअभियंत/जिल्हा गृहनिर्माण अधिकारी उस्मानाबाद यांना सूचना देण्यात येतील.

२. मा. सभापती व मा. सदस्य श्री. उपासे यांनी प्रतिपादन केले की, औरंगाबाद,उस्मानाबाद व हिंगोली येथे राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजनेअंतर्गत कामे झालेली दिसुन येत नाहीत. मनपा/न.प. च्या अधिकाऱ्यांकडुन झोपडपटटी सुधार कामाचे प्रस्ताव प्राप्त होत नाहीत. म्हणून कामे होत नाहीत असे समजते . त्यामुळे औरंगाबाद,उस्मानाबाद व हिंगोली येथील राष्ट्रीय झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत कामे मनपा/नप कडुन होत नसतील तर या तिन्ही ठिकाणचे झोपडपटटी सुधारणा योजनेतील कामे म्हाडाने करावी किंवा ते जिल्हा परिषदेकडे सोपविल्यास झोपडपटटी सुधार योजने अंतर्गत कामे करुन विकास कामे करता येतील. मंडळाचे उपअभियंता/कनिष्ठ अभियंताही समाधानकारकपणे कामे करीत नसल्याचे दिसुन येत आहे, असे मा. सभापती यांनी सांगितले व त्याप्रमाणे दोन्ही ठिकाणचे म्हाडाचे संबंधीत उपअभियंता/शाखा अभियंता यांना लेखी समज द्यावी अशा सूचना दिल्या.

३. मा. सदस्य श्री.उपासे व मा. सदस्य श्री. सावे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंडळान्तर्गत उपअभियंता/शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता हे त्यांचे जिल्हयात मंडळाच्या योजना समाधानाकारक राबवित असल्याचे दिसत नाहीत. त्यामुळे एका ठिकाणी ज्यांना ५ वर्षे पुर्ण झाली आहेत त्यांच्या मंडळान्तर्गत बदल्या कराव्यात म्हणजे योग्यरितीने मंडळाची कामे होऊन मंडळाच्या कामांना गती येईल. तसेच मा. सभापती यांनी बैठकीत सुचना दिल्या की, मंडळान्तर्गत जिल्हास्तरीय अधिकारी हे त्यांचे मुख्यालयात हजर राहत नाहीत असे कळते व त्यामुळे मंडळाची कामे वेळेवर होत नाहीत व कामे खोळंबतात व जनतेची कामे वेळेवर होत नाहीत. यापुढे मा. सभापती व मंडळाचे सर्व मा. सदस्य हे एखाद्या जिल्हयात अचानक गेल्यास व त्यावेळी मंडळाचे जिल्हास्तरीय अधिकरी हे पुरेशा कारणाशिवाय मुख्यालयात गैरहजर असल्याचे आढळुन आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे बैठकीत ठरले. याबाबत कार्यकारी अभियंता व जिल्हा गृहनिर्माण अधिकारी यांना योग्य त्या सूचना देण्यांत येतील असे मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

४. मा. सभापती व मंडळाचे मा. सर्व सदस्यांनी एकमताने निर्णय घेऊन सांगितले की, श्री. ... येथे व लातुर जिल्हयाचे ... नेहमी आजारी असतात व रजेवर असतात त्यामुळे लातुर येथे व लातुर जिल्हयाचे

अखत्यारीत मंडळाची कामे धिम्या गतीने होत आहेत.कामास गती यावी या दृष्टीकोणातुन लातूर विभागाअंतर्गत जास्तीत जास्त कामे व्हावीत या हेतुने श्री. डोगरा यांची बदली औरंगाबाद येथे करावी व श्री. येरावार यांची बदली लातूर येथे करावी याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

५. मा. सदस्य श्री. वाघचौरे व मा. सदस्य श्री. जे.पी. पाटील यांनी वैठकीत प्रतिपादन केले की, लोक आवास योजनेच्या जिल्हास्तरीय कमिटीच्या धर्तीवर वाल्मीकी आंवेडकर मलिन वस्ती आवास योजना अंतर्गत वेळोवेळी होणाऱ्या कमिटीच्या जिल्हास्तरीय वैठकीस औरंगावाद मंडळाचे मा.सभापती यांचे सहीत त्या त्या जिल्हयाचे औरंगाबाद मंडळाच्या सदस्यांना विशेष निमंत्रीत म्हणून बोलविण्यांत यावे. यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवुन त्याप्रमाणे शासन निर्णय करण्यासाठी औरंगावाद मंडळाने प्रस्ताव पाठवावा, असे वैठकीत ठरले.यावावत शासनाकडे लवकरात लवकर प्रस्ताव पाठविण्यात यईल, असे मुख्य अधिकारी यांनी वैठकीत सांगितले.

६. दिनांक २० व २१ जाने.०३ रोजी औरंगावाद येथे मंत्री मंडळाची वैठक होणार आहे. या बैठकीचे औचित्य साधुन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे समवेत मंडळाच्या समस्या सोडविण्यासाठी एक वैठक औरंगावाद मंडळाचे मा. सभापती व सर्व सदस्यां समवेत घेण्याचे बैठकीत सर्वानुमते ठरले.

७. मा. सदस्य श्री. सावे व श्री. उपासे यांनी सांगितले की, मंडळान्तर्गत बांधकाम योजना प्रगतीपथावर आहेत. त्याची माहिती मंडळाच्या सर्व सदस्यांना देण्यांत यावी.
यावर मुख्य अधिकारी यानी सांगितले की, सदर माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधीत अधिकारी यांना तशा सूचना देण्यात येतील.

उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर उपस्थितांचे आभार मानुन मा. सभापती यांचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.